महाराष्ट्र - कर्नाटक सीमाप्रश्नासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल दावा क्र.४/२००४ मध्ये शासनाने नियुक्त केलेल्या वकीलांच्या व्यावसायिक फी चा खर्च मंजूर करण्यास वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-दोन नुसार वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन आदेश क्रमांक : मकसी-१३१६/१३०/प्र.क्र.३६/३६,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०१७

आदेश

महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात महाराष्ट्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र.४/२००४ चे कामकाज पाहण्यासाठी शासनाकडून नियुक्त करण्यात आलेल्या वकीलांच्या फी साठी येणारा खर्च मंजूर करण्यास वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-दोन मधील सोबत जोडलेल्या "प्रपत्र-अ" नुसार सामान्य प्रशासन विभागास वित्तिय अधिकार प्रदान करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्चास मंजुरी देताना प्रपत्रातील नमूद अटींचे काटेकोर पालन करण्यात यावे. तसेच ज्या वकिलांचे वित्त विभागाच्या सहमतीने फी मंजुरीचे आदेश यापूर्वीच निर्गमित करण्यात आले आहेत, अशा प्रकरणी हे आदेश लागू राहतील.

२. यास्तव होणारा खर्च "मागणी क्रमांक ए-४, २०५२-सचिवालय- सर्वसाधारण सेवा-०९०-सचिवालय (००) (०१) सामान्य प्रशासन विभाग, २८-व्यावसायिक सेवा योजनेतर दत्तमत (२०५२ ००२५)" या अर्थसंकल्पीय लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व दरवर्षीच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३२० विनियम, दि.१/७/२०१७ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीनुसार तसेच वित्तीय अधिकार प्रदान समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०२१३१७५६१२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Krishna Bhosale

Digitally signed by Sanjay Krishna Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=68fad25d7626a3cc798a2cdee2480a108e46d2bc3c24f98d38cc78723fe79c0f, cn=Sanjay Krishna Bhosale
Date: 2017.11.03 15:36:01 +05'30'

(सं.कृ.भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) ॲड.शिवाजी जाधव, ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड, "आदित्य व्हीला", ए-८०, सेक्टर-१४, नॉयडा-२०१३०१.

२) महालेखापाल-१ (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
३) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
७) अवर सचिव, वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८) अवर सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
९) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२५), मंत्रालय, मुंबई -४०००३२.
१०) अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२६), मंत्रालय, मुंबई -४०००३२.
११) निवड नस्ती (साप्रवि/३६)

विवरणपत्र

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयातील दाखल दावा क्र.४/२००४ मध्ये शासनाने नियुक्त केलेल्या वकीलांची व्यावसायिक फी प्रदान करणेसंदर्भात भाग-२ मधील वित्तीय अधिकार प्रदान करणेबाबत.

अ.क्र.	वित्तीय शक्तीचे वर्णन	अधिकाराचा वापर करण्यास सक्षम असलेले प्रचलित/प्रस्तावित प्राधिकारी	प्रदान करण्यात आलेली वित्तीय अधिकारांची मर्यादा	अटी
१	२	३	४	५
१	महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयातील दाखल दावा क्र.४/२००४ मध्ये शासनाने नियुक्त केलेल्या वकीलांची व्यावसायिक फी च्या खर्चास मंजूरी देणे. (नवीन शक्ती)	प्रशासनिक विभाग	पूर्ण अधिकार	१) अर्थसंकल्पात तरतूद केलेली असली पाहिजे. २) खर्च मंजूर अनूदानातून भागविण्यात यावा. ३) कार्यपध्दतीविषयक नियमांचे आणि इतर सर्वसाधारण निर्देशाचे अनुपालन करण्यात यावे. ४) विभाग सदर वित्तीय शक्तीचे अधिकार विभागातील सहसचिव/उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यास प्रदान करु शकतील. ५) या अधिकाराखाली विमान प्रवास खर्चास मंजूरी अनुज्ञेय नसेल.